जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
(महसूल शाखा)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, औरंगाबाद

दुरध्वनी क्र.०२४०-२३३४५०१ ई मेल- abdcall@gmail.com

बांधकाम परवाना जा. क्रं.२०१९/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/प्र.क्र.४५ दिनाक. 04/11/२०१९

वाचा-

१ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र जमीन महसूल(जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६.

२ मा.महानगर आयुक्त, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१७/म.आ.विकास परवानगी जा.क्र.२१७ दिनांक २७.१०.२०१७.

३ या कार्यालयाचा अकृषिक आदेश क्र.२०१२/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौजे.आघुर,ता.वैजापुर/प्र.क्र.२५४, दिनांक ०३.०३.२०११.

४ **अर्जदार** श्री.उमेश भुजंगअप्पा वाळेकर व इतर,रा.औरंगाबाद,ता.जि. औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक २५/०७/२०१९ प्राप्त दिनांक ०५.०८.२०१९.

५ या कार्यालयाचे पत्र क्र.२०१९/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/ प्र.क्र.४५, दिनांक २२.०८.२०१९.

६ सहायक संचालक नगर रचना औरंगाबाद पत्र क्र. भुखंड एकत्रिकरण/मौजे.आघुर/ता.वैजापुर/गट क्र.२१९पै/ ससंऔ/१३९८,दिनांक ०९.०७.२०१९.

७ सहायक संचालक नगर रचना औरंगाबाद पत्र क्र.बांधकाम परवानगी/मौजे.आघुर/ता.वैजापुर/ग.नं.२१९पै./ ससंऔ/१८७८,दिनांक २३.०९.२०१९.

:: आदेश ::

ज्याअर्थी, औरंगाबाद जिल्ह्यातील **वैजापुर** तालुक्यातील मौजे **आघुर** येथील गट.क्र. **२१९** येथील वरीष्ठ धारक असलेले **अर्जदार** श्री.उमेश भुजंगअप्पा वाळेकर व इतर,रा.औरंगाबाद,ता.जि. औरंगाबाद येथील रहिवाशी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अन्वये या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०३ चे आदेशानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनिय,१९६६चे कलम ४४ नुसार देण्यात आलेल्या अकृषिक वापराचे परवानगी आदेशानुसार जागेच्या नकाशावर अक्षरांनी दर्शविलेला गट. क्र. २१९ मधील भुखंड क्र. ९५ ते ११४ चे एकत्रिकरण करुन ज्याचे क्षेत्र **२४७५.००** चौ. मि. **निवासी** या प्रयोजनासाठी बांधकाम करण्याची परवानगी करीता औरंगाबाद च्या जिल्हाधिका-यांकडे अर्ज केला आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक ०५ नुसार अर्जाबाबत प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ नुसार प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा करुन अहवाल / अभिप्राय सादर करणे बाबत सहाय्यक संचालक, नगर रचना,औरंगाबाद या कळविण्यात आले होते.

त्यानुसार संदर्भ ०६ नुसार सहाय्यक संचालक, नगर रचना,औरंगाबाद यांनी एकत्रिकरण करुन अहवाल सादर करुन मौजे.आघुर, ता.वैजापुर, जि. औरंगाबाद येथील गट. क्र. २१९पै. मधील भुखंड क्र. ९५ ते ११४ चे एकत्रिकरण करुन त्यास भुखंड क्र. ९५ देवून भुखंडाचे बांधकाम क्षेत्र २५७९.८६ चौ.मि. एवढे प्रस्तावित केले आहे. तसेच संदर्भ क्र.०७ नुसार सहाय्यक संचालक, नगर रचना,औरंगाबाद यांनी अहवाल सादर करुन मौजे.आघुर,ता.वैजापुर,जि.औरंगाबाद येथील गट.क्र.२१९ मधील मंजुर रेखांकनातील भुखंड क्र. ९५ चे बांधकाम क्षेत्र २५७९.८६ चौ.मी.अनुज्ञेय केले असुन संदर्भ क्रमांक ०४ नुसार अर्जदाराने अर्जासोबत सादर केलेले इमारत

नकाशे या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०५ नुसार पाठविण्यात आलेल्या नकाशाची छाननी करुन त्यास अटी व शर्तीवर बांधकाम नकाशांना **रहिवास** प्रयोजनासाठी बांधकाम मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे असे स्पष्ट अभिप्राय सहाय्यक संचालक, नगररचना, औरंगाबाद यांनी संदर्भ क्रमांक ०६ द ०७ नुसार सादर केलेले आहे. संदर्भ क्रमांक ०६ व ०७ अन्वये सहाय्यक संचालक, नगररचना, औरंगाबाद यांनी केलेली शिफारस व दिलेल्या मंजुर इमारत रेखांकनानुसार अर्जदारास त्याच्या अर्जानुसार उक्त जमीनीच्या क्षेत्रावर बांधकाम परवानगी **रहिवास** या प्रयोजनासाठी वापर करण्यास परवानगी देण्यास कोणतीही हरकत नाही अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अन्वये विहित केलेल्या अधिकाराचा वापर करून मी.जिल्हाधिकारी औरंगाबाद पुढील प्रमाणे **अर्जदार** श्री.उमेश भुजंगअप्पा वाळेकर व इतर,रा.औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद यांनी **मौजे. आघुर**,ता.वैजापुर,जि.औरंगाबाद येथील गट.क्र.२१९ मधील भुखंड क्र. ९५ चे बांधकाम परवानगीसाठी संपूर्ण भुखंड क्षेत्र २४७५.०० चौ.मि.पैकी भुखंडधारकाने केलेल्या विनंतीनुसार व सहाय्यक संचालक, नगररचना, औरंगाबाद यांनी भुखंड क्र. ९५ ते ११४ चे नंतर एकत्रिकरण करुन त्यास भुखंड क्र.९५ क्रमांक देवून इमारत मंजुरी रेखांकनानुसार क्षेत्र २५७९.८६ चौ.मी.क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचा **रहिवास** प्रयोजनासाठी पूढील अटी व शर्तीस अधिन राहून बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

१. अर्जदाराने या आदेशात नमुद केलेल्या जमीनीवर बांण्धकाम परवानगी दिलेल्या या आदेशाचे तारखेपासुन / दिनांकापासुन एक वर्षापर्यंत वैद्य राहील.
२. सहाय्यक संचालक नगर रचना,औरंगाबाद या कार्यालयाने विषयांकित प्रकरणी पत्र क्र.७६३,दिनांक ३०.०७.२०१० अन्वये अंतिम मंजुरीची शिफारस करतांना नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी आदेश क्र.२०१०/मशाका/जमीन-१/ एनएपी-३४/मौजे.आघुर,ता.वैजापुर/प्र.क्र.२५४,दिनांक.०३.०३.२०११ अन्वये दिलेल्या अकृषि आदेशातील अटी व शर्तीचे कायम असून त्याचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.तसेच सहाय्यक संचालक नगर रचना,औरंगाबाद या कार्यालयाने भुखंड क्र. ९५ ते ११४ चे एकत्रिकरण करुन त्यास भुखंड क्र. ९५ देवून पत्र क्र. १३९८,दिनांक ०९.०७.२०१९ अन्वये एकत्रिकरण करुन अंतिम मंजुरी दिलेली आहे.
३. प्रकरणी वास्तुशास्त्रज्ञ यांनी सादर केलेले नकाशाच्या आधारे उक्त शिफारस करण्यात येत असून प्रत्याक्षात या व्यतिरीक्त बांधकाम झाल्यास त्यास संबधित वास्तुशात्रज्ञ जबाबदार राहील.
४. बांधकामाच्या ठिकाणी डिसप्ले बोर्ड लावणे व त्यावर खलील प्रमाणे तपशील नमुद करणे आवश्यक राहील. **अ)** जागा मालकाचे, डेव्हलपरचे, वास्तुतज्ञांचे आणि कॉन्ट्रॅक्टरचे नाव व पत्ते. **ब)** सं.नं./सि.स.नं./गट नं. इत्यादी भुखंडाचा तपशील, **क)** बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक, **ड)** अनुज्ञेय करण्यात आलेले बांधीव क्षेत्र, **ई)** मंजुर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पहावयास मिळेल त्या ठिकाणचे / कार्यालयाचे नांव व पत्ता.
५. भुकंप विरोधक व्यवस्था अर्जदाराने करणे बंधनकारक राहील.
६. वरील जागेचा व नियोजीत ईमारतीचा वापर **निवासी** वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.
७. स्थल दर्शक नकाशावर दर्शविल्या प्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहीजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी.
८. नियोजित बांधकामाचे,भुखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरुन एकूण क्षेत्र,सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते / रस्तारुंदीक्षेत्र वगळता, उर्वरित निव्वळ क्षेत्राच्या नकाशावर दर्शविले इतके प्रत्याक्ष जागेवर कमाल राहीले पाहीजे.
९. नियोजित ईमारती मध्ये १/१० रुमच्या क्षेत्राईतके वायुविजन उपलब्ध होणे आवश्यक राहील.
१०. नियोजित ईमारतीसाठी / विकासासाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मेला निर्मुलणाची व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरा पुर्वी अर्जदाराने केली पाहीजे.
११. नियोजित बांधकामात मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

करणाऱ्या बाबी आढळुन आल्यास सदर बांधकाम परवानगीचा आदेश रद्द समजण्यात येईल.

३२. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील अनुषंगीक तरतुदींचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

३३. आदेशातील कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास सदर आदेश तात्काळ रद्द समजण्यात येईल.

जिल्हाधिकारी,औरंगाबाद

:: प्रतिलिपी :: (माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव)

१ उपविभागीय अधिकारी,वैजापुर, जि. औरंगाबाद
२ तहसिलदार,वैजापुर.
३ सहाय्यक संचालक नगररचना,औरंगाबाद,जि.औरंगाबाद.
४ **अर्जदार** श्री.उमेश भुजंगअप्पा वाळेकर व इतर,रा.औरंगाबाद,ता.जि. औरंगाबाद.
५ तलाठी, सझा आघुर,ता.वैजापुर, जि. औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

जिल्हाधिकारी औरंगाबाद करिता

Signature valid

Digitally signed by UDAY GAURISHANKAR CHAUDHARI
Date: 2019.11.04 16:29:31 IST
Reason: Approved